# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dte.org.in


**परिपत्रक**

क्रमांक : 10/एनजीपी/मान्यता/2014-15/44

दिनांक : 21.1.2014

**विषय : शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांना मान्यता प्रक्रियेबाबत**

**संदर्भ : 1. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची जाहिरात क्रमांक : एबी/01(01)/2014**

**2. शासन निर्णय क्र. संकीर्ण 2013/ प्र.क्र.43/ तांशि 4, दि. 21.8.2013**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता, परिषदेमार्फत एआयसीटीई वेब पोर्टलवरील अप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक 2013-14 आणि रेग्युलेशन्स ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन (ग्रान्ट ऑफ अप्रुवल फॉर टेक्निकल इन्स्टिट्यूट) रेग्युलेशन, 2012 मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक 21.1.2014 ते दिनांक 15.2.2014 या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, संबंधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांमार्फत परिषदेकडे सादर केलेल्या अर्जांवर शासनाचे अभिप्राय/ शिफारस परिषदेस सादर करण्याकरीता, संबधीत संस्थांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता www.dtemaharashtra.gov.in/ courseapproval2014 ही लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून या संचालनालयामार्फत देण्यात आलेला सांकेतांक व पासवर्ड व्दारे ऑनलाईन माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संकेतस्थळावर भरल्यानंतर तात्काळ या संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरावी. या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता लिंक दिनांक 15.2.2014 पर्यंतच सुरु राहिल. ज्या संस्थांमार्फत संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने माहिती भरण्यात येईल अशा संस्थांनाच सुनावणीकरीता बोलाविण्यात येवून त्यानुसार या संचालनालयाच्या अभिप्रायांसह शासनामार्फत परिषदेस अभिप्राय/ शिफारस सादर करण्यात येतील. सुनावणी बाबतचे वेळापत्रक वेळोवेळी या संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच संबंधीत संस्थांनी, संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे संदर्भाधीन क्र. 2 च्या शासन निर्णयामध्ये नमूद विहीत केलेले नोंदणी शुल्क भरल्याची पावती, परिषदेचा अद्ययावत डेफिशिअन्सी रिपोर्ट (प्राचार्यांनी प्रमाणीत केलेला), परिषदेस सादर केलेला सहपत्रांसह अर्ज, संस्था प्रमुखांनी प्रमाणित केलेले अॅनेक्चर "सी", "डी" (प्रपत्र) व सक्षम प्राधिकरणने प्रमाणित केलेल्या जागा/ बांधकाम/ इमारतीचे नकाशे, ऑक्युपेन्सी प्रमाणपत्र इ. बाबत सोबत जोडलेल्या अॅनेक्चर "ई" प्रपत्रातील माहिती, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची चालू शैक्षणिक वर्षातील अॅकेडमिक मॉनेटरींग रिपोर्टची प्रत व कागदपत्रांसह सुनावणीकरीता (संस्थेतील जबाबदार व माहितगार व्यक्ती) उपस्थित राहणे आवश्यक आहे, याची नोंद घ्यावी.

तसेच, शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्याकरीता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेकडे ज्या संस्था प्रस्ताव सादर करणार आहेत, त्या संस्थांना सूचीत करण्यात येते की, त्यांनी संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे तात्काळ संपर्क साधून विहित मुदतीत, संदर्भाधीन 2 च्या शासन निर्णयामध्ये नमूद विहित शुल्क भरुन तपासणी हेतूने प्रस्ताव सादर करावा. अन्यथा संबंधीत संस्थांच्या प्रस्तावांवर या संचालनालयामार्फत दखल घेतली जाणार नाही व अशा संस्थांची परिषद/ शासनाकडे शिफारस करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

असेही नमूद करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता पदविका अभ्यासक्रमाच्या सध्या सुरु असलेल्या पदविका संस्थेमधील सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत घट, पदविका अभ्यासक्रम बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात/ पत्यात बदल/ जागेत बदल, महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रुपांतरीत करणे इ. बाबत ज्या पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर करणार आहेत., अशा संस्थांनी शासनामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातून परिषदेमार्फत निर्धारीत व खाली नमूद कागदपत्रांसह, दिनांक 15.2.2014 पूर्वी तसा स्वतंत्र प्रस्ताव या संचालनालयास सादर करावा. प्रस्ताव प्राप्त न झालेल्या/ विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांची/ कागदपत्रांची या संचालनालयामार्फत दखल घेतली जाणार नाही व अशा संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक .....539.....
दिनांक .....23 JAN 2014.....

1. सदर पदविका अभ्यासक्रम बंद/ अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणे/ संस्था बंद करणे, संस्थेच्या नावात/ पत्त्यात बदल/ जागेत बदल/ महिलांसाठी असलेली संस्था/ सह-शैक्षणिक संस्थेत रुपांतरीत करणेबाबत संबंधीत संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांच्या स्वाक्षरीच्या ठरावाची मुळप्रत.
2. पदविका अभ्यासक्रम बंद / अभ्यासक्रमाची प्रवेशक्षमता कमी करणे/ संस्था बंद करणे, पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे संस्थेच्या नावात/ पत्त्यात बदल/ जागेत बदल/ महिलांसाठी असलेली संस्था/ सह-शैक्षणिक संस्थेत रुपांतरीत करणेबाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत.
3. संबंधीत अभ्यासक्रमासाठी संयुक्त खात्यात मुदतठेव ठेवण्यात आलेल्या असल्यास सदर मुदतठेवीची साक्षांकित प्रत.
4. तसेच सदर अभ्यासक्रम बंद/ प्रवेशक्षमता कमी/ संस्था बंद / पदविका अभ्यासक्रमाची संस्था बंद करणे संस्थेच्या नावात/ पत्त्यात बदल/ जागेत बदल/ महिलांसाठी असलेली संस्था/ सह-शैक्षणिक संस्थेत रुपांतरीत केल्यानंतर प्रवेशित विद्यार्थी किंवा नेमणूक केलेले कर्मचारी यांचे पर्यायी समायोजन कसे करणार याबाबतची कार्यपध्दती नमूद करुन याबाबत काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्यास पूर्णपणे आपली संस्था जबाबदार राहील अशा आशयाचे 100 रु. च्या स्टँपपेपर संस्थेने केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.
5. संदर्भाधीन क्र. 2 च्या शासन निर्णयामध्ये नमूद विहीत केलेले नोंदणी शुल्क विभागीय कार्यालयामार्फत शासनास भरलेल्या पावतीची साक्षांकित छायाप्रत.

पुढे असेही नमूद करण्यात येते की, ज्या संस्थाना शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता फक्त मुदतवाढ (प्रवेशक्षमता वाढ घट इ. नसल्यास) (EOA) मिळणेबाबत प्रस्ताव सादर करावयाचे असतील अशा संस्थानी सदर प्रस्तावांची प्रत थेट या संचालनालयास सादर न करता, संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास, सादर करावी . सदर प्रस्ताव प्राप्त झाल्याबाबत या संचालनालयाच्या वतीने संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत पोच देण्यात यावी. पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांचे फक्त मुदतवाढ (EOA) मिळण्याबाबतचे प्रस्ताव थेट या कार्यालयात स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई.

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.
1. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त विषयाबाबत प्रस्ताव सादर केलेल्या सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष 2014-15 करीता नवीन पदविका संस्थांच्या तपासणीबाबत/ मुदतवाढ (EOA) प्रस्तावांबाबत या कार्यालयाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशांच्या अनुषंगाने आवश्यक ती तात्काळ कार्यवाही करावी.
2. कार्यासन क्रमांक 3(आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई यांना या संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.
3. कार्यासन क्रमांक 13 (नोंदणीशाखा), मुख्य कार्यालय, मुंबई .

क्र :—तंशिस/प्राकाना/पदविका /./२०१३/ 266
दि. 24 JAN 2014

प्रति,
प्राचार्य,
सर्व पदविका संस्था
नागपूर विभाग.

सर्व पदविका संस्थांनी उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत कार्यवाही करावी.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागिय कार्यालय,
नागपूर

Annexure E

On letter head of Architect

This is to certify that the total carpet area of (institute name) building constructed on property bearing (Survey No. etc ) of village/ city/ town at ---------- is ---------- $m^2$ . Including the Circulation area & other area required for operation of the college is mentioned below is ready.

| Sr.No. | | No. | Total Area in $m^2$ |
|---|---|---|---|
| 1 | Class room | | |
| 2 | Tutorial Room | | |
| 3 | Laboratory | | |
| 4 | Work Shop | | |
| 5 | Additional work shop lab/ for category 'x' | | |
| 6 | Computer centre | | |
| 7 | Drawing Hall | | |
| 8 | Library & reading room | | |
| 9 | Seminar Room | | |
| 10 | Faculty Room | | |
| 11 | Instructional Area | | $m^2$ |
| 12 | Administrate Area | | $m^2$ |
| 13 | Amenities Area | | $m^2$ |
| 14 | Circulation Area | | $m^2$ |
| 15 | Total carpet up Area | | $m^2$ |
| 16 | Any other | | $m^2$ |

Seal

Signature of Architecture
Registration No.

# ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION
## (A STATUTORY BODY OF THE GOVERNMENT OF INDIA)

7th Floor, Chandarlok Building, Janpath, New Delhi-110 001
Ph. No.: 011-23724151-57, Website: www.aicte-india.org

## PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2014-15

(I) Applications are invited for **"Setting up New Diploma and Post Diploma level institutions (Stand alone polytechnic)"**, other than those which require affiliation from University for the Academic Year 2014-15.

(II) Applications are also invited for following process in **"Existing diploma and post diploma level institutions (stand alone polytechnic)"**, other than those which are affiliated to University for the academic year 2014-15.

| | |
|---|---|
| (a) Change of site/location; | (h) Mandatory provision of supernumerary seats for TFW; |
| (b) Closure of Institution; | (i) Introducing / continuing / discontinuing supernumerary seats for PIO; |
| (c) Conversion of Women's Institution into Co-educational Institution; | (j) Introducing / continuing / discontinuing seats for sons/daughters of NRIs; |
| (d) Extension of Approval; | (k) Change of name of Institute; |
| (e) Increase/Reduction in intake; | (l) Starting 2nd Shift Programmes; |
| (f) Adding Courses in existing Programme; | (m) Starting Part Time Programmes. |
| (g) Closure of Programme/Course; | |

- Filing online applications for the session 2014-15 in respect of all approvals as above shall begin on 21st January, 2014 and shall end on 15th February, 2014.
- Processing of all applications submitted online for the session 2014-15 in respect of all approvals as above shall begin on 1st February, 2014 and shall end on 31st March, 2014.
- All applicants are requested to read the AICTE Process Hand Book (2013-14) and Regulations- All India Council For Technical Education (Grant of approval for Technical Institution) Regulation, 2012 thoroughly, before filing online applications on AICTE Web Portal www.aicte-india.org for the session 2014-15.

Advt No. AB/01(01)/2014

**Dr. K.P. Isaac**
**Member Secretary**

# ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन

(भारत सरकारची सांविधिक संस्था)

७ वा मजला, चंदरलोक बिल्डिंग, जनपथ, नवी दिल्ली-११० ००१

फोन नं. : ०११-२३७२४१५१-५७. वेबसाइट : www.aicte-india.org

## २०१४-१५ मान्यता प्रक्रियेची जाहीर सूचना

(I) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता विद्यापीठाकडील संलग्नीकरण ज्यांच्यासाठी आवश्यक असते त्यांच्याखेरीज अन्य, **''पदविका व पदविकोत्तर पातळीवरील नवीन संस्था (स्वतंत्र पॉलिटेक्निक) उभारणे''** यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

(II) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करिता विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संस्थांखेरीज अन्य **''पदविका व पदविकोत्तर पातळीवरील विद्यमान संस्था (स्वतंत्र पॉलिटेक्निक)''** मधील पुढील प्रक्रियेसाठीसुद्धा अर्ज मागविण्यात येत आहेत.

| | |
|---|---|
| (ए) साइट/लोकेशनमध्ये बदल; | (एच) टीएफडब्ल्यूकरिता अधिसंख्य आसनांची अनिवार्य तरतूद; |
| (बी) संस्था बंद करणे; | (आय) पीआयओकरिता अधिसंख्य आसने सुरू करणे/ चालू ठेवणे/ खंडित करणे; |
| (सी) महिलांसाठी असलेली संस्था, सह-शैक्षणिक संस्थेत रूपांतरित करणे; | (जे) अनिवासी भारतीयांच्या मुलांसाठी/ मुलींसाठी जागा ठेवणे सुरू करणे/ चालू ठेवणे/ खंडित करणे; |
| (डी) मान्यता देणे; | (के) संस्थेचे नाव बदलणे; |
| (ई) प्रवेशसंख्येत वाढ/घट; | (एल) २ऱ्या पाळीचा कार्यक्रम सुरू करणे; |
| (एफ) विद्यमान प्रोग्राममध्ये अभ्यासक्रमांची भर घालणे; | (एम) अर्धवेळ कार्यक्रम सुरू करणे. |
| (जी) प्रोग्राम/ अभ्यासक्रम बंद करणे; | |

- वरीलप्रमाणे सर्व मान्यतांबाबत सत्र २०१४-१५ साठी ऑनलाइन अर्ज सादर करणे २१ जानेवारी २०१४ रोजी सुरू होईल आणि १५ फेब्रुवारी २०१४ रोजी बंद होईल.
- वरीलप्रमाणे सर्व मान्यतांबाबत सत्र २०१४-१५ साठी ऑनलाइन सादर केलेल्या सर्व अर्जांवरील प्रक्रिया १ फेब्रुवारी २०१४ पासून सुरू होईल व ३१ मार्च २०१४ रोजी बंद होईल.
- सत्र २०१४-१५ करिता एआयसीटीई वेब पोर्टलवर **www.aicte-india.org** वर ऑनलाइन अर्ज सादर करण्यापूर्वी सर्व अर्जदारांनी एआयसीटीई प्रोसेस हॅण्ड बुक (२०१३-१४) आणि रेग्युलेशन्स ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (ग्रान्ट ऑफ अप्रूव्हल फॉर टेक्निकल इन्स्टिटय्यूट) रेग्युलेशन, २०१२ सांगोपांगपणे वाचावे.

**डॉ. के. पी. आयझॅक**
**सदस्य सचिव**

जाहिरात क्र. एबी/०१(०१)/२०१४